महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/३०६३४
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २७/१२/२०१८

# परिपत्रक

**विषय :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांसाठी **सन २०१९** या कॅलेंडर वर्षासाठी सार्वजनिक सुट्टया जाहीर करणेबाबत.

.....

प्रशासकीय परिपत्रक क्र. ०१ दिनांक २९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी **सन २०१९** या वर्षासाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या **२० सार्वजनिक सुट्टया** महावितरण कंपनीच्या प्रशासकीय कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता [कर्मचारी सेवा विनियमातील परिशिष्ट 'क' (APPENDIX-'A') मध्ये समाविष्ट केलेल्या पदांवर काम करणारे कर्मचारी व प्रशासकीय कार्यालयांव्यतिरिक्त इतर ठिकाणी काम करणारे कर्मचारी, तसेच स.सा.आदेश क्र. १२२ (क) दि.२२.०३.१९९० सोबतच्या जोडपत्र 'क' (ANNEXURE-'A') आणि त्यानंतरच्या दि. ०३.०४.१९९० व दि. १८.०८.१९९० च्या पूरकपत्रांमध्ये नमूद केलेल्या पदावर काम करणारे कर्मचारी वगळून] जाहीर करण्यास मंजूरी दिली आहे. सदर सार्वजनिक सुट्टया या राज्य शासनाने परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ (Negotiable Instruments Act 1881) खाली घोषित केलेल्या सार्वजनिक सुट्टया आहेत.

२. कर्मचारी सेवा विनियमाशी संलग्न असलेल्या परिशिष्ट 'क' (APPENDIX-'A') अंतर्गत मोडणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कामाचे ठिकाण विचारात न घेता त्या कर्मचाऱ्यांना तसेच कंपनीची प्रशासकीय कार्यालये वगळता विद्युत उपकेंद्र अथवा कार्यालये/कार्यस्थाने (वर्क साईटस्/घटक/आस्थापना) या ठिकाणी काम करणाऱ्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना (ते कोणत्या परिशिष्टाखाली मोडतात हे विचारात न घेता) आणि सामान्य आदेश क्र. १२२ (क) दि. २२.०३.१९९० सोबतच्या जोडपत्र 'क' (ANNEXURE-'A') व त्यासंबंधीची पूरकपत्रे दि. ०३.०४.१९९० व दि. १८.०८.१९९० यामध्ये नमूद केलेल्या पदांवर काम करणारे कर्मचारी यांना प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिन अगर त्याबद्दलची पर्यायी सुट्टी जमेस धरुन फक्त **६ (सहा) भरपगारी सुट्टया** जाहीर करण्यास मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मंजूरी दिली आहे. प्रभारी अधिकाऱ्यांची पूर्व मंजूरी घेऊन या कर्मचाऱ्यांना वरील प्रमाणे ६ (सहा) सुट्टया उपभोगता येतील.

३. नाममात्र हजेरीपटावरील आणि कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना (नैमित्तिक कामगार वगळून) सन २०१९ यावर्षी प्रजासत्ताक दिन (दि. २६ जानेवारी) व स्वातंत्र्य दिन (दि. १५ ऑगस्ट) या दोन राष्ट्रीय सणांच्या दिवशी तसेच महाराष्ट्र दिन (दि. १ मे) या राजकीय सणाच्या दिवशी भरपगारी सुट्टया मंजूर करण्यात आल्या आहेत. या सुट्टीच्या दिवशी काम करणारे कर्मचारी बदली/पर्यायी सुट्टी मंजूर करुन घेण्यास पात्र राहतील.

४. तसेच मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र. साप्रवि/ सा/ सा.सु./ ३५१७ दि. २१.०९.१९९६ अन्वये गुरुवार दि. १२.०९.२०१९ रोजी अनंत चतुर्दशी निमित्त मुंबई शहर व मुंबई उपनगरातील कंपनीच्या प्रशासकीय कार्यालयामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकरीता स्थानिक सुट्टीचा दिवस म्हणून जाहीर करण्यात येत आहे.

५. सदर परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

२७/१२/२०१८

(तुषार अर्जुनवाडकर)
महाव्यवस्थापक (मासं-नियोजन)

सहपत्रे : सार्वजनिक सुट्टयांची सूची
(परिशिष्ट - 'अ')

**परिशिष्ट 'अ'**

**सार्वजनिक सुट्टया-२०१९**

**(अ)**

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | वार |
|---|---|---|---|
| १. | छत्रपति शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी, २०१९ | मंगळवार |
| २. | महाशिवरात्री | ०४ मार्च, २०१९ | सोमवार |
| ३. | होळी (दुसरा दिवस) | २१ मार्च, २०१९ | गुरुवार |
| ४. | गुढीपाडवा | ०६ एप्रिल, २०१९ | शनिवार |
| ५. | महावीर जयंती | १७ एप्रिल, २०१९ | बुधवार |
| ६. | गुड फ्रायडे | १९ एप्रिल, २०१९ | शुक्रवार |
| ७. | महाराष्ट्र दिन | ०१ मे, २०१९ | बुधवार |
| ८. | बुध्द पौर्णिमा | १८ मे, २०१९ | शनिवार |
| ९. | रमझान ईद (ईद-उल-फितर) (शव्वल-१) | ०५ जून, २०१९ | बुधवार |
| १०. | बकरी ईद (ईद-उल-झुआ) | १२ ऑगष्ट, २०१९ | सोमवार |
| ११. | स्वातंत्र्य दिन | १५ ऑगष्ट, २०१९ | गुरुवार |
| १२. | पारशी नववर्ष (शहेनशाही) | १७ ऑगष्ट, २०१९ | शनिवार |
| १३. | गणेश चतुर्थी | ०२ सप्टेंबर, २०१९ | सोमवार |
| १४. | मोहरम | १० सप्टेंबर, २०१९ | मंगळवार |
| १५. | महात्मा गांधी जयंती | ०२ ऑक्टोबर, २०१९ | बुधवार |
| १६. | दसरा | ०८ ऑक्टोबर, २०१९ | मंगळवार |
| १७. | दिवाळी (बलिप्रतिपदा) | २८ ऑक्टोबर, २०१९ | सोमवार |
| १८. | भाऊबीज | २९ ऑक्टोबर, २०१९ | मंगळवार |
| १९. | गुरुनानक जयंती | १२ नोव्हेंबर, २०१९ | मंगळवार |
| २०. | ख्रिसमस | २५ डिसेंबर, २०१९ | बुधवार |

**(ब)**

खालील सुट्टया महिन्याच्या **दुसऱ्या/ चौथ्या शनिवारी व रविवारी** येत असल्यामुळे त्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आलेली नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी, २०१९ | चौथा शनिवार |
| २. | राम नवमी | १३ एप्रिल, २०१९ | दुसरा शनिवार |
| ३. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल, २०१९ | रविवार |
| ४. | दिवाळी अमावस्या (लक्ष्मीपूजन) | २७ ऑक्टोबर, २०१९ | रविवार |
| ५. | ईद-ए-मिलाद | १० नोव्हेंबर, २०१९ | रविवार |